N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
**प्रथम खबर अहवाल**
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** नांदेड **P.S.(ठाणे):** इस्लापूर **Year (वर्ष):** 2021

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0054 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 30/06/2021 16:45 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(b) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार

**Time Period (कालावधी):** पहर 4

**Date From (दिनांक पासून):** 30/06/2021
**Date To ( दिनांक पर्यंत):** 30/06/2021
**Time From (वेळेपासून):** 10:15 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 10:30 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 30/06/2021 **Time (वेळ):** 16:45 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 022 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 30/06/2021 16:45 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** उत्तर, 2 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** शासकिय आश्रम शाळा नविन , सहस्त्रकुंड,किनवट

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** शिवाजी चंपती खोकले

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1970 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**



Scanned by CamScanner

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | शासकिय आश्रम शाळेजवळ,सहस्त्रकुंड,किनवट ,इस्लापूर,नांदेड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | वाळकी बु,किनवट ,इस्लापूर,नांदेड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.): 91-9423510141**

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | नामदेव सोपानराव कैलवाड | | पत्नी का नाम : मंजुळाबाई | 1. शिवालय निवास वैभव नगर ,नांदेड, नांदेड,इस्लापूर,नांदेड,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11 Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12 First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांकः- 30/06/2021. मी

शिवाजी चंपती खोकले, वय 51 वर्ष, धंदा शेतमजुरी, रा. मु.पो.वाळकी (बु.) सहस्त्रकुंड , हा.मु. सहस्त्रकुंड आश्रम शाळे जवळ, ता.किनवट, जि.नांदेड.मो.नं. 7744953640 व 9423510141मी वरील ठिकाणचा राहाणार असुन शेत मजुरी व शेती करून स्वतःचा व कुंटूबीयांचा उदनिर्वाह करतो. मी आमचे घरा समोरील शासकीय माध्यमीक व उच्च माध्यमीक आश्रमषाळा सहस्त्रकुंड ता. किनवट येथे शाळेचे मुख्याध्यापक कैलवाड सर, व अधिक्षक पवार सर यांच्या तोंडी सांगण्यावरून जुलै 2019 पासुन जानेवारी 2020 पर्यन्त रोजंदारी कर्मचारी म्हणुन काम केले होते. जुलै, ऑगस्ट, व ऑक्टोबर 2019 या महिण्यांच्या कामाची मजुरी मला मिळाली होती. पण सप्टेंबर, नोव्हेंबर, डिसेंबर 2019 व जानेवारी 2020 या चार महिण्यांची मजुरीचे बिल मंजुर होवुन मिळाले नव्हते. ते मिळण्यास मी दिनांक 5/12/2020 रोजी मुख्याध्यापकांना तसेच दिनांक 6/1/2021 व 22/1/2021 रोजी प्रकल्प अधिकारी एकात्मीक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय किनवट यांना अर्ज दिले होते. अंदाजे विस दिवसांपुर्वी मुख्याध्यापक श्री कैलवाड सरांनी माझे घरी येवुन मला या मजुरीचे पैसे 25,400/-रूपये तुमच्या खात्यात जमा करण्यात आल्याचे सांगुन काहीना काही किनवटच्या प्रकल्प कार्यालयातील राठोड साहेबाला खर्चा बक्षीस द्याव लागते म्हणाले. दिनांक 28/6/2021 रोजी मुख्याध्यापक श्री कैलवाड सर सायंकाळ साडेपाच वाजाताचे सुमारास माझे घरा समोरील रोडवर सहस्त्रकुंड येथे भेटुन म्हणाले की,मी राठोड साहेबांना तुमच्या झालेल्या कामा करीता बक्षीस म्हणुन माझे जवळचे 2000/- रू दिले आहेत. ते मला तुम्ही द्या असे म्हणून मजुरीचे बिल काढलेचा मोबदला/बक्षीस स्वरूपात लाचेची मागणी केली आहे. त्यांच्या विरूध्द कार्यवाही व्हावी. याकरीता मी दिनांक 29/6/2021 रोजी लाच लुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड येथे त्यांचे विरूध्द तक्रार दिली.मी दिलेल्या तक्रार वरून लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पो.नि.श्री पुरी यांनी त्यांच्या पथकातील सदस्य स.पो.उप.नि.शेटे, पोलिस नाईक श्री गंगातिर्थ, पो.ना. श्री दर्शन यादव, चालक ना.पो. कॉं. शेख मुजीब तसेच पंच क्र.1) सुनिल घाळे व पंच क्र.2) किशोर बेदरकर यांची ओळख करून दिली तसेच दिनांक 29/6/2021 रोजी लाचमागणी पडताळणी कार्यवाही दरम्यान सापळा अधिकारी, पोलीस निरीक्षक श्री पुरी यांनी पथकातील सदस्य, पंच व मला कार्यवाही संबधाने सुचना दिल्या.त्यानंतर मी माझे मोटार सायकलने व पथक शासकीय वाहनाने ईस्लापुर येथे आले. नायक पो.कॉं. गंगातीर्थ यांनी नविन मेमरी कार्ड मध्ये पो.नि. पुरी यांचे, माझे, व पंचाचे परिचय दर्शक वक्तव्य ध्वनिमुद्रीत केले. पंच क्र.1) सुनिल घाळे यांच्या समक्ष मी लोकसेवक मुख्याध्यापक कैलवाड यांची भेट 17.20 ते 19.30 वाजताचे दरम्यान माझे घरा समोरील रोडवर सहस्त्रकुंड येथे भेट घेतली असता त्यांनी मला मजुरीचे बिल मंजुर करण्या करीता दोन हजार खर्च केला आहे.ट्रेझरीला दिड हजार दिले. राठोड क्लार्कला पाचशे रूपये दिले. असे म्हणुन दोन हजार रूपयाची बक्षीस लाचेची मागणी करून तडजोडी अंती 1,500/-रूपये बक्षीस लाच स्विकारण्याची तयारी दर्शविली. आज दिनांक 30/6/2021 रोजी लावण्यात आलेल्या सापळा कार्यवाहीत पो.ना यादव यांनी लाचेच्या रक्कमेला अँन्थ्रासीन पावडर लावुन माझे कडे दिले



Scanned by CamScanner

तसेच पो.ना. गंगातीर्थ यांनी 08.50 वाजता माझे कडे डिजीटल व्हॉईस रेकार्डर चालु करून दिले. त्यानंतर मला व पंच क्र.1) सुनिल घाळे यांना रवाना केले. आम्ही माझे मोटर सायकलने जावुन प्रथम ईस्लापुर येथील फॉरेस्ट नाक्याजवळ लोकसेवक मुख्याध्यापक कैलवाड यांची प्रतीक्षा केली तेथे सापळा लावण्यात आला परंतु त्यांची भेट झाली नाही. त्यानंतर नविन शासकीय माध्यमीक व उच्च माध्यमीक आश्रमशाळा, सहस्त्रकुंडचे प्रांगणात लावण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान भेट झाली तेथे पंच क्र.1) सुनिल घाळे यांचे समक्ष मी बक्षीस लाचेची रक्कम 1500/-रूपये लोकसेवक मुख्याध्यापक कैलवाड यांच्या समोर धरली असता त्यांनी ईशारा करून त्यांच्या हातातील वही स्वतः दोन्ही हाताने उघडुन त्यात बारीक आवाजात ठेवा असे म्हणले असता मी त्या वहीमध्ये लाचेची रक्कम ठेवली.याप्रकारे त्यांनी लाच रक्कम स्विकारली आहे. मला दिलेल्या सुचनेप्रमाणे मी व पंच क्र.1) सुनिल घाळे पथकास शाळेच्या गेट बाहेर येवुन गळ्यातील दस्ती हातात धरून तोंड पुसून 10.15 वाजताचे सुमारास ईशारा केला. तो पर्यंत शाळेत आलेल्या एका टेम्पो मध्ये मुख्याध्यापक कैलवाडसर बसुन बाहेर निघाले. पो.ना. गंगातीर्थ यांनी माझे कडील डिजीटल व्हॉइस रेकॉर्डर 10.39 वाजता बंद केले. त्यांचे मागे पथकाने पाठलाग करून वाळकी गावात ते धान्य वाटप करीत असतांना त्यांना ताब्यात घेवुन त्यांची अंगझडती घेवुन त्यांनी स्विकारलेली बक्षीस लाचेची रक्कम पाचशे रूपयाच्या तिन नोटा 1500/-रूपये वहीसह जप्त करून पंचनामा करण्यात आला. लोकसेवक कैलवाड टेम्पोत बसुन वाळकी गावा पर्यंत गेलेल्या टेम्पोचा क्र.एम.एच. 15-ई-2031 असा होता. लोकसेवक नामदेव सोपानराव कैलवाड, वय 56 वर्ष, मुख्याध्यापक शासकीय माध्यमीक व उच्च माध्यमीक आश्रमशाळा सहस्त्रकुंड ता. किनवट, रा.शिवालय, वैभवनगर, जैन मंदिराचे जवळ नांदेड यांनी स्वतःच्या अधिक फायद्याकरीता पदाचा गैरवापर करून पंच क्र.1) सुनिल घाळे यांच्या समक्ष माझे कंत्राटी मजुरीचे सप्टेंबर, नोव्हेंबर, डिसेंबर 2019 व जानेवारी 2020 या चार महिण्याचे काढलेले बिलाचा मोबदला बक्षीस म्हणुन दोन हजार रूपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती 1500/-रूपये स्विकारण्याची तयारी दर्शवुन ती दिनांक 30/06/2021 रोजी 10.15 वाजताचे सुमारास शासकीय माध्यमीक व उच्च माध्यमीक आश्रमशाळा सहस्त्रकुंड येथे ईशारा करून स्वतःचे हातात असलेल्या वहिमध्ये ठेवण्यास सांगुन स्विकारलेली आहे. तरी लोकसेवक नामदेव सोपानराव कैलवाड, वय 56 वर्ष, मुख्याध्यापक शासकीय माध्यमीक व उच्च माध्यमीक आश्रमशाळा सहस्त्रकुंड यांच्या विरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 अंतर्गत कायदेशीर कार्यवाही व्हावी म्हणुन माझी फिर्याद आहे. ही फिर्याद दिली.

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** **or (किंवा)**

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):** RAMRAO TUKARAM POTE
**Rank (पद):** HC (Head Constable)
**No.(क्र.):** POBN72221 **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

**(4) Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**
**District (जिल्हा):**
**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

**14.Signature/Thumb Impression of the complainant / informant.(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

**15.Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

30/6/21

पोलीस ठाणे अंमलदार
पो.ठाणे,इस्लापूर जि.नांदेड

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची)**

**Name (नाव):** sushant Ganpat kinge
**Rank(पद):** SI (Sub-Inspector)
**No.(सं.):** 17101045318M



Scanned by CamScanner